हिंदी विद्या प्रचार समितीद्वारा संचालित

**रामनिरंजन झुनझुनवाला कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय(अधिकारप्रदत्त स्वायत्त)**

**T.Y.B.A. Marathi OJT Syllabus Semester VI**

**Hindi Vidya Prachar Samiti's**

**Ramniranjan Jhunjhunwala College of Arts, Science & Commerce**

**(Empowered Autonomous College)**

**Affiliated to**

**UNIVERSITY OF MUMBAI**

**Syllabus For T.Y.B.A. (level 5.5 under NEP-2020)**

**Program: B.A. MARATHI**

**Program Code: RJMAR**

**Course: Marathi On Job Training (OJT)**

**Course Code: RJOJTMAR361**

**Sem. VI (level 5.5)**

**CBCS**

**Multidisciplinary Degree Program with Multiple entry and Exit (NEP-2020)**

**2025-26**

## प्रास्ताविक

## मराठी भाषा आणि मराठी साहित्य का अभ्यासायचं?

मानवी भाषा हे भावना-विचार यांच्या संप्रेषणाचं अत्यंत महत्त्वपूर्ण माध्यम आहे. मातृभाषा ही मानवाला आईच्या गर्भात असल्यापासून अवगत असणारी गोष्ट आहे. जन्माला आल्यापासून आपण भाषा ऐकतो, ती आत्मसात करू लागतो, मग हळू हळू बोलू लागतो. आपल्या रोजच्या जीवनव्यवहारात श्वासाइतकीच भाषेची अपरिहार्य गरज आपल्याला असतोच. कारण माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे आणि भाषा हे समाजव्यवहाराचं अविभाज्य अंग आहे. त्यामुळे भाषाप्रभुत्व ही यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली आहे. दैनंदिन व्यवहारापुरता भाषेचा वापर मर्यादित नाही. उत्तम भाषेचा संस्कार हा तुमच्या जगण्याला दिशा देणारा, जीवन घडवणारा असतो. भाषा तुमच्या भावनिक, सांस्कृतिक गरजांचं भरणपोषण करून व्यक्तिमत्त्वविकास घडवते.

भाषेचं हे सामर्थ्य लक्षात घेता, तिचं स्वरूप समजून घेणं, तिचा शास्त्रशुद्ध अभ्यास करणं किती अनिवार्य आहे हे तुमच्या लक्षात येईल.

प्रत्येक समाजाच्या भाषेची अशी काही खास वैशिष्ट्यं असतात..त्या त्या समाजाच्या भाषेमध्ये निर्माण होणारं साहित्य म्हणजे त्या समाजाचा भावनिक उद्गार असतो.त्या समाजातील साहित्य हे मानवी समाजाचं प्रतिबिंब असतं ,असं मानलं जातं. प्रत्येक समाजातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक,आर्थिक, भौगोलिक इ. परिस्थितीचा अभ्यास करायचा झाल्यास, त्या समाजात निर्माण झालेल्या साहित्याचा अपरिहार्यपणे आधार घ्यावा लागतो. म्हणजेच, साहित्याच्या अभ्यासाने या सर्व घटकांचं भान येतं, ज्ञान प्राप्त होतं. भाषा आणि साहित्य यांच्या अभ्यासाने आपण ज्ञानसमृद्ध आणि भावसंपन्न होतो.

मराठी भाषेला आणि साहित्याला अकराव्या शतकापासूनची प्रदीर्घ परंपरा आहे.

"माझा मऱ्हाटाची बोलु कवतिके। परि अमृतातेही पैजा जिंके। ऐसी अक्षरे रसिके। मेळवीन॥"

या शब्दांत ज्ञानदेवांनी आपल्या भाषेचं सामर्थ्य व्यक्त केलं. या सामर्थ्याची ओळख आपण अभ्यासक्रमाच्या माध्यमातून करून घेणार आहोत.

**आर.जे.मध्ये मराठी साहित्याचा अभ्यास का निवडायचा?**

आपल्या महाविद्यालयाच्या स्थापनेपासून, म्हणजे १९६३ पासून मराठी विभागही अस्तित्वात आला.. म्हणजेच मराठी विभागाला जवळजवळ ६० वर्षांची परंपरा आहे. मराठी विभागाबरोबरच मराठी वाङ्मय मंडळाचीही स्थापना झाली. विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाबरोबरीनेच त्यांचा सर्वांगीण विकास घडावा आणि त्यांची वाङ्मयीन अभिरूची सुसंस्कारित व्हावी यांसाठी मराठी विभाग आणि मराठी वाङ्मय मंडळ भाषाविषयक विविध नवनवीन उपक्रमांचं आयोजन करीत असतं. प्रसिद्ध लेखकांची व्याख्यानं, लेखकांशी संवाद साधणाऱ्या मुलाखती, अभ्यासक्रमावर आधारित वृत्तांतलेखन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, निबंधलेखन स्पर्धा तसंच 'आविष्कार' भित्तिपत्रक व हस्तलिखित व इ-अंक यांचंही आयोजन केलं जातं. मुलाखत तंत्र समजून घेण्यासाठी विद्यार्थ्यांना मुलाखतीची संधी उपलब्ध करून दिली जाते. या व्यतिरिक्त विद्यार्थ्यांसाठी कौशल्यविकसन तसेच मूल्यवर्धित अभ्यासक्रमही मराठी विभागातर्फे घेतले जातात. अ) मराठी भाषा आणि मराठी साहित्यातील संवाद आणि मानवी मूल्य. या अभ्यासक्रमांच्या साहाय्याने विद्यार्थ्यांना व्यवसायाच्या दिशा उपलब्ध होऊ शकतात.
राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार मराठी साहित्याच्या अभ्यासक्रमाची आखणी करताना व्यावसायिक उपयोजन, कौशल्य विकसन व विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास ही गरज ओळखून उपयोजित मराठी, मराठी युनिकोड टंकलेखन, मराठी शुद्धलेखन आणि मुद्रितशोधन कार्यालयीन पत्रव्यवहार , अर्जलेखन, वृत्त-वृत्तांतलेखन यांबरोबरच भाषांतर, जाहिरातलेखन, ग्रंथपरीक्षण या घटकांचाही अभ्यासक्रमात समावेश केला आहे.

तृतीय वर्ष कला शाखेच्या अभ्यासक्रमाची आखणी विद्यार्थ्यांना लोकसेवा आयोगाच्या विविध परीक्षांसाठी उपयुक्त होईल,याचे भान ठेवून केली आहे.

विद्यार्थ्यांनी मराठी या विषयाची निवड केल्यास व्यवहारचतुर आणि संवेदनशील व्यक्तिमत्त्व म्हणून विद्यार्थ्यांची जडणघडण होईल, अशी खात्री वाटते.

## तृतीय वर्ष कला शाखा मराठी सत्र ६

## व्यवसायगत कार्यानुभवाद्वारे प्रशिक्षण – On Job Training (OJT ) (RJOJTMAR361)

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांच्या अंतर्गत आखलेल्या शैक्षणिक श्रेयांक संरचनेमधे सहा स्तंभामधे विविध विषयांची आखणी करण्यात आली आहे. यातील सहावा स्तंभ हा अनुभवाधिष्ठित शिक्षणाचा आहे. याच स्तंभामधे पाठ्यपूरक अभ्यासक्रम(CC), क्षेत्र प्रकल्प(FP), सामाजिक सामिलकी आणि समाजसेवा प्रकल्प (CEP) इत्यादी अभ्यासविषयांप्रमाणे **व्यवसायगत कार्यानुभवाद्वारे प्रशिक्षण(OJT)** हाही अभ्यासक्रम समाविष्ट आहे. विषयाशी संबंधित विविध व्यवसायक्षेत्रांतील कामाचे स्वरूप कसे असते, याचा विद्यार्थ्यांना परिचय व्हावा आणि एखाद्या व्यवसायक्षेत्रामधे प्रत्यक्ष काम करण्याचा अनुभव विद्यार्थ्यांना मिळावा हे व्यवसायगत कार्यानुभवाद्वारे प्रशिक्षण(OJT) या अभ्यासपत्रिकेचे उद्दिष्ट आहे. विद्यार्थ्यांनी पदवी अभ्यासक्रमात घेतलेले पुस्तकी शिक्षण म्हणजे अर्जित केलेले ज्ञान तसेच आत्मसात केलेली कौशल्ये आणि व्यवसायक्षेत्रातील प्रत्यक्षातील वास्तव परिस्थिती यांची सांगड घालत समस्यावर उपाय शोधण्याचा प्रयत्न करावा, हेही अपेक्षित असेल. प्रत्यक्ष कामातून मिळणारे ज्ञान व माहिती त्यांच्या पुस्तकी शिक्षणाला पूरक असेल. उद्याचे भविष्य असणाऱ्या आजच्या तरुणांच्या व्यक्तित्वविकासासाठी आणि सर्वांगीण अध्ययनप्रक्रियेसाठी हे हे व्यवसायगत कार्यानुभवाद्वारे प्रशिक्षण(OJT) उपयुक्त आहे.

| | | |
|---|---|---|
| SEMESTER | : | VI |
| CATEGORY UNDER NEP | : | Marathi OJT |
| TITLE OF THE SUBJECT/COURSE | : | Marathi- On Job Training |
| COURSE CODE | : | RJOJTMAR361 |
| CREDITS | : | 04 |
| DURATION | : | 120 Hours |

| **T.Y.B.A.**<br>**तृतीय वर्ष**<br>**कला शाखा** | **Marathi OJT**<br>**व्यवसायगत कार्यानुभवाद्वारे प्रशिक्षण** |
|---|---|
| **अभ्यासपत्रिकेची उद्दिष्टे (Learning Objective):** | |
| १. | विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष नोकरी, काम करण्याचा अनुभव मिळावा. विद्यार्थ्यांना भाषा आणि साहित्याविषयी अर्जित ज्ञान व कौशल्ये यांची व्यवसायक्षेत्रातील प्रत्यक्ष कामाशी सांगड घालता यावी व त्यांचे उपयोजन करता यावे. |
| २. | कोणत्याही व्यवसायक्षेत्रातील प्रत्यक्ष कामाचे स्वरूप, तेथील आव्हाने, संधी यांचा विद्यार्थ्यांना परिचय व्हावा. |
| ३. | विद्यार्थ्यांना विश्लेषण, व्यवस्थापन, निर्णयक्षमता, समस्यानिवारणक्षमता, संघभावना, समूहाचा सदस्य म्हणून काम करण्याची क्षमता, आंतरव्यक्तिसंबंध, व्यायसायिक नीतिमत्ता यांसारखी व्यायसायिक कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळावी. |
| ४. | कार्यक्षेत्रामधे वापरल्या जाणाऱ्या अत्याधुनिक तंत्रज्ञान किंवा व्यावसायिक तंत्रज्ञानप्रणालींचा परिचय व्हावा. |
| ५. | उद्योजकता (Entrepreneurship) वृद्धिगंत व्हावी व स्वतंत्र व्यवसाय करण्यास उत्तेजन मिळावे. |
| ६. | विद्यार्थ्यांना पदवी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर संभाव्य नोकरी मिळण्याच्या शक्यता निर्माण करणे. |

| **CO No. निष्पत्ती क्र.** | **अभ्यासपत्रिकेची निष्पत्ती (Course Outcome):** | **PSO Addressed** | **BLOOMS LEVEL** |
|---|---|---|---|
| १. | विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष नोकरी, काम करण्याचा अनुभव मिळावा. विद्यार्थ्यांना भाषा आणि साहित्याविषयी अर्जित ज्ञान व कौशल्ये यांची व्यवसायक्षेत्रातील प्रत्यक्ष कामाशी सांगड घालता यावी व त्यांचे उपयोजन करता येईल. | 10,12 | BT Level II, III, IV, V Understand, Apply, Analyze, Evaluate |
| २. | कोणत्याही व्यवसायक्षेत्रातील प्रत्यक्ष कामाचे स्वरूप, तेथील आव्हाने, संधी यांचा विद्यार्थ्यांना परिचय होईल. | 10,12 | BT Level II, III, IV, V Understand, Apply, Analyze, Evaluate<br>BT Affective Domain level I, II, III, IV Receiving, responding, Valuing, organizing |
| ३. | विद्यार्थ्यांना विश्लेषण, व्यवस्थापन, निर्णयक्षमता, समस्यानिवारणक्षमता, संघभावना,समूहाचा सदस्य म्हणून काम करण्याची क्षमता, आंतरव्यक्तिसंबंध, व्यायसायिक नीतिमत्ता यासारखी व्यायसायिक कौशल्ये आत्मसात करण्याची संधी मिळेल. | 3,10,12 | BT Level II, III, IV, V Understand, Apply, Analyze, Evaluate<br><br>BT Affective Domain level I, II, III, IV Receiving, responding, Valuing, organizing, Characterizing |
| ४. | कार्यक्षेत्रामधे वापरल्या जाणाऱ्या अत्याधुनिक तंत्रज्ञान किंवा व्यावसायिक तंत्रज्ञान प्रणालींचा परिचय होईल. | 10,12 | BT Level II, III, IV, V Understand, Apply, Analyze, Evaluate<br>BT Affective Domain level I, II, III, IV Receiving, responding, Valuing, organizing, Characterizing |
| ५. | उद्योजकता (Entrepreneurship) वृद्धिगंत होईल व स्वतंत्र व्यवसाय करण्यास उत्तेजन मिळेल. | 10,12 | BT Affective Domain level I, II, III, IV Receiving, responding, Valuing, organizing |
| ६. | विद्यार्थ्यांना पदवी शिक्षण पूर्ण झाल्यानंतर संभाव्य नोकरी मिळण्याच्या शक्यता निर्माण होतील. | 10,12 | BT Affective Domain level I, II, III, IV Receiving, responding, Valuing, organizing |

| **सत्र ६** | | **तास H** | **श्रेयांक Cr** |
|---|---|---|---|
| **मराठी व्यवसायगत कार्यानुभवाद्वारे प्रशिक्षण** | **RJOJTMAR361** | **१२०** | **०४** |

विद्यार्थ्यांनी पुढीलपैकी कोणत्याही क्षेत्रामधे सहभागी होऊन अपेक्षित एकशेवीस अध्ययन तास पूर्ण करावेत आणि या अभ्यासक्रमाची अपेक्षित उद्दिष्टे साध्य करावीत:

१. प्रत्यक्ष प्रशिक्षण- अध्यापन, पत्रकारिता, प्रसारमाध्यमे व व्यावसायिक मजकूरलेखन, सर्जनशील लेखन, शब्दांकन, लेखनसाहाय्य, प्रकाशन, भाषांतर, संकलन व संपादन, मराठी टंकलेखन व मुद्रितशोधन, पर्यटन इत्यादी मराठीशी संबंधित क्षेत्रात प्रशिक्षण.
२. लघु संशोधन प्रकल्प.
३. सेमिनारमध्ये उपस्थिती, सेमिनारची तयारी करण्यासाठी नियुक्त केलेले जर्नल्स वाचणे.
४. विशिष्ट उद्योजकांचा अभ्यास करणे.
५. सामाजिक प्रकल्पात सहभाग.
६. उद्योग/शेतकऱ्यांचा अभ्यास.
७. औद्योगिक/सरकारी/बिना सरकारी संस्था(NGO)/ मध्यम-लघु-सूक्ष्म-कुटीरोद्योगांमधे (MSME) मध्ये उमेदवारी(इंटर्नशिप).
८. ग्रामीण इंटर्नशिप.
९. नवोन्मेष- नावीन्यपूर्ण व्यवसाय/सेवा..
१०. उद्योजकता.
११. नियमित अर्धवेळ/पूर्णवेळ नोकरी.

**T.Y.B.A. SEM – VI**

**तृतीय वर्ष कला शाखा, सत्र ६**

**व्यवसायगत कार्यानुभवाद्वारे प्रशिक्षण – On Job Training (OJT) (RJOJTMAR361)**

**मूल्यमापन**

**मूल्यमापन योजना :**

१. प्रत्येक विद्यार्थ्याला व्यवसायगत कार्यानुभवाद्वारे प्रशिक्षण- नोंदपुस्तक **(OJT–BOOK)** दिले जाईल.

२. या नोंदपुस्तकात नोकरी/स्वयंरोजगाराच्या कार्यानुभवाची दैनंदिनी (Activity Log/Diary), हजेरीपत्रक (Attendance), अहवाल (OJT Report) यांचा समावेश असेल. विद्यार्थ्यांनी प्रशिक्षणांतर्गत जे प्रत्यक्ष काम केले असेल त्या कार्याची नोंद कार्यानुभवाच्या दैनंदिनीत करायची आहे. हजेरीपत्रक भरायचे आहे. हजेरीपत्रक आणि दैनंदिनी प्रशिक्षणदाता संस्थेच्या संबंधित अधिकाऱ्याने प्रमाणित करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर प्रशिक्षणाचे आपले अनुभव, प्रशिक्षणातून मिळालेले ज्ञान,माहिती, कौशल्ये, प्रशिक्षणाचा लाभ हे सगळे तपशीलवारपणे अहवालात लिहायचे आहेत. आवश्यक तेथे दोन स्थलकालांकित छायाचित्रे म्हणजे जिओटॅग्ड फोटोही अहवालाचा भाग म्हणून पुस्तकात चिकटवावेत.

३. व्यावसायिक / लघुउद्योजक इत्यादी स्वयंरोजगार (Entrepreneurship) श्रेणीतील प्रशिक्षणार्थींनी सुद्धा कार्यानभवाची दैनंदिनी भरणे आवश्यक आहे. काम करताना प्रत्येकी पाच मिनिटांच्या किमान तीन स्थलकालांकित ध्वनिचित्रफीती जिओटॅग्ड व्हिडिओ मुद्रित कराव्यात. स्वयंरोजगारातून उत्पादित वस्तू/सेवा यांचे जिओटॅग्ड फोटो, ग्राहकांचे प्रतिसाद (Feedback), उत्पन्नाचा हिशोब यांचा समावेश अहवालात करावा.

४. सत्राअखेरीस व्यवसायगत कार्यानुभवाद्वारे प्रशिक्षणाच्या मूल्यमापनासंदर्भात मुलाखतवजा तोंडी परीक्षा घेतली जाईल. तेव्हा प्रशिक्षण- नोंदपुस्तक व संबंधित सर्व कागदपत्रे, पूरक लेखनसाहित्य, छायाचित्रे, ध्वनिचित्रफीत, उत्पादित वस्तूंचे नमुने इत्यादींसह उपस्थित राहावे.

**Evaluation Rubrics मूल्यमापन सारणी:**

| Parameters | | Marks | (80 to 100%) Excellent | (60 to 80%) Good | (40 to 60%) Satisfactory | (20 to 40%) Average |
|---|---|---|---|---|---|---|
| Actual Work Done<br><br>(to be assessed by Internal Supervisor) | | 40 | 32-40/40 | 24-32/40 | 16-24/20 | 8-16/20 |
| Activity Log and Attendance | | 20 | 16-20/20 | 12-16/20 | 8-12/20 | 4-8/20 |
| OJT Report written | | 20 | 16-20/20 | 12-16/20 | 8-12/20 | 4-8/20 |
| Presentation and Communication Skills | | 20 | 16-20/20 | 12-16/20 | 8-12/20 | 4-8/20 |

# Ramniranjan Jhunjhunwala College of Arts, Science & Commerce

# (Empowered Autonomous)

**Name of the Students Intern:**

**Class:** **Subject:** **Roll No:**

**Rubric for internship Supervisor in IPO**

| Grade / Parameter | Excellent 80- 100% | Good 60-80 % | Satisfactory 40-60 % | Average Needs Improvement Below 40 % | Total |
|---|---|---|---|---|---|
| Quality of work, interest and readiness to learn **20 marks** | | | | | |
| Initiative, Innovation and sense of responsibility **4 marks** | | | | | |
| Capacity of application, analyzing and Problem-solving approach **4 marks** | | | | | |
| Linguistic Skills, Communication Skills Technological Skills **4 marks** | | | | | |
| Behavior at workplace and Interpersonal Skills **4 marks** | | | | | |
| Punctuality and Work Ethics **4 marks** | | | | | |
| **Grand Total** | | | | | |

**Name of the Evaluator Authority from IPO:**

**Signature with Date and Stamp:**

## Mapping of the courses to employability / entrepreneurship / skill development

| Class | Course Name | Course Code | Employability / Entrepreneurship / Skill development |
|---|---|---|---|
| TYBA<br>Sem VI | Marathi - On Job Training | RJOJTMAR361 | A. Employability<br>B. Entrepreneurship<br>C. Skill Development-<br>1. Interpersonal Skills<br>2. Social Skills<br>3. Communication skill<br>4. Writing Skill<br>5. Technological Skills<br>6. Application Skills |

## Mapping of Curriculum with relevance to local, regional, national and global Developmental needs

| Sr. No. | Class | Course Name | Course Code | Relevance |
|---|---|---|---|---|
| 1. | TYBA<br>Sem VI | Marathi - On Job Training | RJOJTMAR361 | Relevance to Local, Regional, National, Global Developmental Needs |

## Mapping of Curriculum with Cross cutting Issues Viz. Professional Ethics, Gender, human Values, Environment and sustainability

| Sr. No. | Class | Name of the Course | Course Code | Issues Addressed |
|---|---|---|---|---|
| 1. | TYBA<br>Sem VI | Marathi - On Job Training | RJOJTMAR361 | Professional Ethics, Gender Sensitization, Human Values and Environment and sustainability |

**Mapping of Curriculum with Sustainable Development Goals (SDG) and NEP 2020**

| Sr. No. | **Class** | **Name of the Course** | **Course Code** | **SDG** | **NEP 2020** |
|---|---|---|---|---|---|
| 1. | TYBA<br><br>Sem VI | Marathi - On Job Training | RJOJTMAR361 | SDG 4(Quality Education),<br><br>SDG 5(Gender Equality)<br><br>SDG 8 (Decent Work and Economic growth)<br><br>SDG 10(Reduce Inequalities)<br><br>SDG 11 (Sustainable Cities & Communities)<br><br>SDG 15(Life on Land)<br><br>SDG 16(Peace, Justice and Strong Institution) | Holistic Development.<br><br>Skill Development.<br><br>Experiential Learning.<br><br>Human Values. |